दिनांक 28/08/2025

## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक** - 1) श्री राजू मोसम बरडे, पोलीस हावलदार,ब.नं. 163, 2) श्री रवींद्र रामदास तायडे, पोलीस अंमलदार. दोन्ही नेम. पोलीस ठाणे सोयगाव (ग्रामीण) जिल्हा छत्रपती संभाजीनगर रा. शिवाजीनगर आमखेडा ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर. **आरोपी खाजगी ईसम** :- 3) अरविंद बिरबल राठोड, व्यवसाय शेती व हॉटेल 4) सुनील मुरलीधर सोनोने, व्यवसाय हॉटेल मालक हॉटेल न्यू मुरली यांनी तक्रारदार यांच्या कडुन तडजोडी अंती 3,000/- (तिन हजार रुपये) रुपये लाच स्विकारल्याने आरोपी लोकसेवक व आरोपी खाजगी ईसम लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळयात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे सोयगाव, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | **आरोपी लोकसेवक** - 1) श्री राजू मोसम बरडे, वय 36 वर्ष, व्यवसाय,नोकरी पद पोह का. 163 ने. पोलीस ठाणे (सोयगाव) (ग्रामीण) , रा. दयाळ नगर ,ता. सोयगाव जि.छत्रपती संभाजीनगर.<br>2) श्री रवींद्र रामदास तायडे, वय 38 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद पो अंम.ने. पोलीस टाणे सोयगाव (ग्रामीण) जिल्हा छत्रपती संभाजी नगर रा. शिवाजीनगर आमखेडा ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर.<br>**आरोपी खाजगी ईसम** :-<br>3) अरविंद बिरबल राठोड वय 29 वर्ष, व्यवसाय शेती व हॉटेल रा. जरंडी संत सेवालाल चौक जरंडी ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर<br>4) सुनील मुरलीधर सोनोने वय 53 वर्ष व्यवसाय हॉटेल मालक हॉटेल न्यू मुरली रा. सोयगाव ,जुना बाजार चौक ,जिल्हा छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | 15,000/- (पंधरा हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 3,000/- ( तिन हजार रुपये) |
| सापळा अधिकारी<br>सहाय्यक सापळा अधिकारी | श्री. योगेश शिंदे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर<br>श्री. वाल्मीक कोरे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांच्या विरोधातील पो.स्टे सोयगाव (ग्रामीण) येथील तक्रार अर्ज निकाली काढलेल्या तक्रारअर्जात तक्रारदाराच्या विरोधात कोणतीच कारवाई केली नाही म्हणून बक्षीस/मोबदला म्हणून आलोसे 1 आणि 2 हे खाजगी इसम क्रमांक 3 यांच्या करवी 15000/ रुपयांची मागणी केली होती. |
| थोडक्यात माहिती | दिनांक 28/08/2025 रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची शासकीय पंच समक्ष पडताळणी केली असता आलोसे 1 आणि 2 यांनी खाजगी इसम क्रमांक 3 यांच्या मार्फतीने तक्रारदाराकडे उर्वरित 10000/रुपये लाच मागणी करून तडजोडी अंती आलोसे क्रमांक 2 याने 3000/ रुपये स्वीकारण्याचे कबूल केले.<br>आलोसे यांनी स्वतः आणि खाजगी इसम मार्फत केलेल्या लाच मागणी पडताळणी नंतर आज दिनांक 28/08/2025 रोजी शासकीय पंच समक्ष हॉटेल न्यू मुरली , सोयगाव या ठिकाणी सापळा कारवाई आजमावली असता आलोसे क्रमांक 2 याने स्वतः हजर राहून लाच रक्कम खाजगी इसम क्रमांक 4 हॉटेल मालक या कडे तक्रारदारास देण्यास सांगितले. सदर लाच रक्कम खाजगी इसम क्रमांक 4 यांनी स्वीकारली. सबब आलोसे 1, 2 खाजगी इसम 3 आणि 4 यांना ताब्यात घेण्यात आले आहे.<br>आलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच आलोसे व आरोपी खाजगी ईसम यांच्या विरुध्द पोलीस ठाणे सोयगाव, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असुन नमुद गुन्हयाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मार्फत करण्यात येत आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक, श्री. योगेश शिंदे यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोलीस निरीक्षक, श्री.वाल्मीक कोरे, पोलीस हवलदार राजेंद्र जोशी, पोलीस अंमलदार प्रकाश डोंगरदिवे, चालक चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205

पोलीस उप अधीक्षक :- 9923247986

S/D

... ह.नाईकनवरे
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
छत्रपती संभाजीनगर